| | |
|---|---|
| MHKO050006472026 | **संक्षिप्त फौजदारी खटला क्रं. ३६३/२०२६**<br><br>**नि.१ वरील आदेश** |

**<u>फौजदारी प्रक्रिया संहिता १९४७ चा अधिनियम दोन, प्रकरण एकवीस अन्वये संक्षिप्त संपरीक्षा केलेचा अभिलेख.</u>**
**<u>मे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, इचलकरंजी यांचे न्यायालयात.</u>**
**<u>(पिठासीन अधिकारी ए. एम. गायकवाड)</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अपराध घडल्याचा दिनांक | : | ३०/०९/२०२५ |
| २. | अहवाल किंवा फिर्यादीचा दिनांक | : | ३०/०९/२०२५ |
| ३. | फिर्यादीचे नांव, वय व पत्ता | : | जयदीप जयसिंग बागडे,<br>पो.कॉ.ब.नं. १६०४,<br>इचलकरंजी पोलिस ठाणे, इचलकरंजी |
| ४. | आरोपीचे नांव, वय व पत्ता | : | १. ऋषिकेश मोहन मोहिते, व.व. २८,<br>रा. जवाहरनगर, विघ्नहर्ता मंदीर शेजारी, इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर,<br>२. निखील दत्तात्रय रसाळ, व. व. २५,<br>रा. जवाहरनगर गणपती मंदीराशेजारी, इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर. |
| ५ | कलम | : | सिगारेट ॲण्ड टोबॅको प्रोडक्ट ॲक्ट २०२३ चे कलम २० प्रमाणे. |

६. दिनांक ३०/०९/२०२५ रोजी १७.३० वा. चे सुमारास इचलकरंजी शहरातील जनता बँक, फळ मार्केट रोडवर असले प्लेअर्स पानशॉप येथे आरोपी क्र. १ हा रक्कम रू.१३००/- चा सुगंधी तंबाखू, सुगंधी सुपारी व वेगवेगळया पत्यांचे मिश्रण करून तयार केलेला मावा व आरोपी क्र. २ हा रक्कम रू.८००/- चा सुगंधी तंबाखू, सुगंधी सुपारी व वेगवेगळया पत्यांचे मिश्रण करून तयार केलेला मावा असा एकूण रक्कम रू. २१००/- किंमतीचा मावा त्यावर कोणतेही लेबल न लावता अथवा त्याचेवर सुरक्षेबाबत वैधानिक इशारा लिहिलेला नसताना आरोपी क्र. १ व २ यांनी अवैध्यरित्या विक्री करण्याचे उद्देशाने जवळ बाळगलेले मिळून आलेने तुम्ही सिगारेट ॲण्ड टोबॅको प्रोडक्ट ॲक्ट २०२३ चे कलम २० प्रमाणे अपराध केलेला आहे. सदरचा गुन्हा या न्यायालयाच्या दखलगिरीत घडला आहे. आरोपीला आरोप वाचून दाखविणेत आले व समजाविणेत आले.

७. आरोपीचे प्रतिकथन

प्र.क्र.१ तुम्हांला पोलीस पेपर्सच्या नकला मिळाल्या काय ?

उत्तर होय.

प्र.क्र.२ तुमचे विरुध्दचा तुम्हाला वाचून दाखविलेला आरोप समजला काय ?

उत्तर होय.

प्र.क्र.३ तुम्हाला गुन्हा कबुल आहे काय ?
उत्तर होय. मला गुन्हा कबूल आहे.

समोर
आरोपीची सही.

**इचलकरंजी**
**दि. ०२/०७/२०२६**

**(अर्चना एम. गायकवाड)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, इचलकरंजी,**
**जि. कोल्हापूर**

**न्यायनिर्णय**
**(जाहीर दिनांक ०२/०७/२०२६)**

१. आरोपी न्यायालयासमोर हजर झाले असता त्यांनी सदरचा गुन्हा कबूल असल्याचे सांगितले. तसेच गुन्हा कबूल करताना त्यांच्याविरुध्द कुठल्याही प्रकारचा दबाव किंवा प्रलोभन नसल्याचेही सांगितले. म्हणुन आरोपींना त्यांच्या विरुध्द ठेवण्यात आलेल्या आरोपाचा सारांश वाचून समजावून सांगितला असता त्यांनी गुन्हा कबुल आहे असे पुन्हा सांगितले. त्यामुळे आरोपींची कबूली स्वखुषीने आहे असे दिसून येते.

२. आरोपींना शिक्षेबाबत विचारले असता तो एकुलता एक कर्ता पुरुष असून आर्थिक परिस्थिती गरीब असलेने कमी दंड करण्याची विनंती केली. आरोपींची आर्थिक परिस्थिती व सध्यस्थिती या दोन्ही गोष्टी लक्षात घेता खालील आदेश पारीत करण्यात येतो.

**आदेश**

| | |
|---|---|
| १. | आरोपी क्र. १ व २ यांना भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम २७५ अन्वये सिगारेट ॲण्ड टोबॅको प्रोडक्ट ॲक्ट २०२३ चे कलम २० केलेल्या अपराधामध्ये दोषी धरणेत येत असून त्यांस **प्रत्येकी रक्कम रूपये २०००/- (रुपये दोन हजार रुपये फक्त )** दंड व दंड न दिल्यास दोन दिवसांची साध्या कारावासाची शिक्षा सुनावणेत येत आहे. |
| २. | प्रस्तुतची केस निर्णयित झालेली असल्यामुळे प्रकरण बंद करण्यात येते. |

**(येणेप्रमाणे खुल्या न्यायालयात उदघोषित.)**

ARCHANA MANOJ GAIKWAD
Digitally signed by ARCHANA MANOJ GAIKWAD
Date: 2026.07.02 16:09:29 +0530

**इचलकरंजी**
**दि. ०२/०७/२०२६**

**(अर्चना एम. गायकवाड)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, इचलकरंजी,**
**जि. कोल्हापूर**